**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर**

जुने सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर – ४४०००१
दुरध्वनी क्र.०७१२-२५६२५६८ ई-मेल dycommgadngp@gmail.com

निवडणूक महत्वाचे

क्र. साप्रशा/पदविधर मतदार संघ/कावि- ९२/२०२६
दिनांक- १२/०१ /२०२६.

प्रति,

मा.संचालक
माहिती व जनसंपर्क विभाग,
नागपूर.

विषयः दिनांक ०१/११/२०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर नागपूर विभागातील पदवीधर मतदारसंघाच्या अंतिम मतदार यादयांची प्रसिध्दी करण्याबाबत.

संदर्भ :- १) मा. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ३२२/LC/G&T/E-ROLL-BIEN दिनांक १२ सप्टेंबर, २०२५
२) मा. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ३२२/MT-LC/G&T/E-ROLL-BIEN दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५
३) मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक ईएलआर-२०२५/प्र.क्र.८७/निवडणूक-६ दिनांक २६ नोव्हेंबर, २०२५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये भारत निवडणूक आयोगाने दि.12 सप्टेंबर, 2025 रोजीच्या पत्रान्वये दिनांक 01/11/2025 या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार संघासाठी नव्याने (De-Novo) मतदारयाद्या तयार करण्याचा सुधारीत कार्यक्रम संदर्भिय पत्र क्र.02 अन्वये घोषित केलेला आहे.

त्याअनुषंगाने नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाकरीता दि.12/01/2026 रोजी अंतिम मतदार यादी विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर येथे दिनांक 12 जानेवारी, 2026 रोजी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

सबब, नागपूर विभाग पदवीधर मतदार संघासाठी अंतिम मतदार यादी प्रसिध्दीबाबतची माहिती व्यापक प्रसिध्दी देण्यांत येवून या कार्यालयास तसे अवगत करावे. नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाच्या कार्यक्रमाचे टप्पे व अंतिम मतदार यादी प्रसिध्दीसंबधी प्रेस नोट या सोबत संलग्न करण्यात आलेली आहे.

(मा.विभागीय आयुक्त महोदया यांच्या मान्यतेने)

सहपत्र – वरीलप्रमाणे (प्रेस नोट)

12/1/2026
(तेजुसिंग पवार)
अपर आयुक्त (सा.प्र.)
नागपूर विभाग, नागपूर

Kodape 12/1/26

संचालक, माहिती व जनसंपर्क
महाराष्ट्र शासन
जुने सचिवालय
नागपूर-४४० ००१

**दिनांक 01 नोव्हेंबर, 2025 या अर्हता दिनांकावर आधारीत नागपूर विभागातील पदवीधर मतदार संघासाठी अंतिम मतदार यादी प्रसिध्दीबाबत माहिती**

विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणूकीच्या नागपूर विभागातील पदवीधर मतदार संघाचे सदस्य दिनांक 06/12/2026 रोजी निवृत्त होत आहेत. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | विधान परिषद सदस्य यांचे नाव | मतदार संघाचे नाव | निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | श्री. अभिजित गोविंदराव वंजारी | नागपूर विभाग पदवीधर | दि. 06/12/2026 |

उपरोक्त मतदार संघातील विधान परिषदेचे सदस्य दिनांक 06/12/2026 रोजी निवृत्त होत असल्याने, भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक 322/LC/G&T/E-ROLL-BIEN दि. 12.09.2025 व पत्र क्र. ३२२/MT-LC/G&T/E-ROLL-BIEN दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ नुसार महाराष्ट्र राज्याकरीता दिनांक 01 नोव्हेंबर, 2025 या अर्हता दिनांकावर आधारीत नागपूर विभागातील पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याकरीता खालील प्रमाणे कार्यक्रम घोषित केलेला आहे.

| अ.क्र. | कार्यक्रमाचे टप्पे | कालावधी |
|---|---|---|
| 1 | प्रकरणपरत्वे नमुना 18 द्वारे अर्ज स्वीकारण्यांचा अंतिम दिनांक | दि. 06 नोव्हेंबर, 2025 (गुरूवार) |
| 2 | हस्तलिखिते तयार करणे व प्रारूप मतदार याद्यांची छपाई | दि. 28 नोव्हेंबर, 2025 (शुक्रवार) |
| 3 | प्रारूप मतदार यादयांची प्रसिद्धी | दि. 03 डिसेंबर, 2025 (बुधवार) |
| 4 | दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी (मतदार नोंदणी अधिनियम 1960 चे कलम 12 अंतर्गत) | दि. 03 डिसेंबर, 2025 (बुधवार ते दि.18 डिसेंबर, 2025 (गुरूवार) |
| 5 | दावे व हरकती निकाली काढण्यांचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे. | दि. 05 जानेवारी, 2026 (सोमवार) |
| 6 | मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी | दि. 12 जानेवारी, 2026 (सोमवार) |

त्याअनुषंगाने दिनांक 12/01/2026 रोजी अंतिम मतदार यादयांची प्रसिध्दी करण्यात आलेली असून खालीलप्रमाणे जिल्हानिहाय अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत मतदारांची नोंदणी झालेली आहे.

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | मतदान केंद्र क्रमांक | प्रारुप मतदार यादीतील एकुण मतदारांची संख्या | अंतिम मतदार संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | नागपूर | 1 ते 139 | 34967 | 76870 |
| 2 | भंडारा | 140 ते 157 | 13008 | 15241 |
| 3 | गोंदिया | 158 ते 174 | 15742 | 17291 |
| 4 | वर्धा | 175 ते 203 | 11862 | 14670 |
| 5 | चंद्रपूर | 204 ते 239 | 20761 | 24360 |
| 6 | गडचिरोली | 240 ते 256 | 10875 | 11493 |
| एकुण | | | 107215 | 159925 |

दिनांक 03 डिसेंबर, 2025 ते 18 डिसेंबर, 2025 या कालावधीत प्रारुप मतदार यादीवर दावे व हरकती स्विकारुन त्या निकाली काढण्यात आल्या व त्यानंतर अंतिम मतदार यादीची प्रसिध्दी ही दिनांक 12 जानेवारी, 2026 रोजी करण्यात येत आहे.